# घटक ६ = नागरीकत्व



भारतात दोन प्रकारचे लोक:

① नागरीक ⟶ राष्ट्राचे पूर्ण सदस्य – नागरी आणि राजकीय हक्क असतात.

② परकीय ⟶ पूर्ण सदस्य नसतात – सर्व नागरी व राजकीय हक्क नसतात.

↳ दोन प्रकार → मित्र राष्ट्रांचे नागरीक असलेले परकीय.

→ शत्रू ———— ॥ ————

घटनेने भारतीय नागरिकांना खालील हक्क व विशेष हक्क दिलेले आहेत (परकीयांना नाही.)

① धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्मस्थान यावरून भेदभाव करण्याविरुद्धचा हक्क – (कलम १५)
② सार्वजनिक नोकऱ्या बाबतीत समान संधीचा हक्क (कलम १६)
③ भाषण व अभिव्यक्ती, एकत्र येणे, संघटना स्थापन करणे, संचार, वास्तव्य, व्यवसाय करणे (कलम १९)
④ सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क : कलम २९ व ३०
⑤ मतदानाचा हक्क
⑥ निवडणूक लढविण्याचा हक्क
⑦ उच्च दर्जाची पदे धारण करणे.

* भारतामध्ये राष्ट्रपती पदासाठी जन्माने व वास्तव्याने नागरिक झालेली व्यक्ती पात्र असतात.
अमेरिकेत मात्र फक्त जन्माने xxxx ———— ॥ ———— असते.

## घटनात्मक तरतुदी :

घटनेचा भाग → 2

कलम → ५ ते ११ – यामध्ये घटना लागू करतेवेळीच्या तरतुदी.

→ घटना लागू झाल्यानंतरच्या भावीसाठी – नागरिकत्व अधिनियम १९५५ पारित केला.
त्यामध्ये १९५५, ६०, ८५, ८६, ९२, २००३, ०५, १५ साली दुरुस्त्या.

२६ जाने १९५० : खालील चार व्यक्ती भारताच्या नागरीक बनल्या :

① भारतात वास्तव्य करणारी व्यक्ती : खालील ३ पैकी एक अट पूर्ण करीत असेल.
① जिचा जन्म भारतात झाला असेल.
② जिच्या आई वडिलांपैकी एकाचा जन्म भारतात झाला असेल.
③ घटना लागू होण्यापूर्वी लगेचची ५ वर्षे ती भारतात वास्तव्य करीत असेल. (कलम ५)

② जी व्यक्ती पाकिस्तानातून भारतात स्थलांतर झाली असेल व जिचा / जिच्या आई वडीलांपैकी एकाचा / आजी आजोबांपैकी एकाचा जन्म अविभाजित भारतात झाले असेल व पुढीलपैकी एक अट पूर्ण करीत असेल. ① ती १९ जुलै १९४८ पूर्वी भारतात स्थलांतरीत झाली असेल आणि तेव्हापासून वास्तव्य करीत असेल.
② ती १९ जुलै १९४८ नंतर भारतात स्थलांतरीत झाली असेल तिने नागरीक म्हणून नोंदणी केली असेल नोंदणीपूर्वी ६ महिने वास्तव्य (कलम ६)

Scanned by CamScanner

३) जी व्यक्ती १ मार्च १९४७ नंतर भारतातून पाकिस्तानात स्थलांतरीत झाली असेल नंतर पुन्हा स्थायिक होण्यासाठी भारतात परत आली असेल आणि नोंदणीचा अर्ज करण्यापूर्वी सहा महिने भारतात वास्तव्य असेल (कलम ७)
(ही तरतूद १ मार्च ४७ ते २६ जाने १९५० पर्यंतच्या बाबींसाठी) त्यानंतरचे १९५५ कायद्याने

४) जिचा / आई-वडीलांपैकी एकाचा / आजी आजोबांपैकी एकाचा जन्म अविभाजित भारतात पण जी व्यक्ती आता सामान्यपणे भारताच्या बाहेर वास्तव्यास असेल अशा व्यक्तीने घटना लागू होण्यापूर्वी किंवा नंतर तिने वास्तव्य असलेल्या देशातील भारताच्या दुतावासाच्या प्रतिनिधीने तिचे भारतीय नागरिक अशी नोंद केल्यास (कलम ८)

इतर:
→ ① व्यक्तीने स्वेच्छेने परदेशातील नागरिकत्व स्विकारले तर ती भारताची नागरिक राहणार नाही (कलम ९)
② जी व्यक्ती भारताची नागरिक आहे ती भारताची नागरिक राहील (कलम १०)
③ नागरिकत्वाच्या संबंधी तरतुदी करण्याचा संसदेला अधिकार. (कलम ११)

## भारतीय नागरिकत्वाचा कायदा १९५५

घटना लागू झाल्यानंतर नागरिकत्व मिळविणे किंवा गमावणे याबाबतच्या तरतुदी या कायद्यामध्ये राष्ट्रकुलाच्या नागरिकत्वाची तरतूद होती ती २००३ नुकतीच रद्द.

नागरिकत्वाची प्राप्ती - = १९५५ च्या कायद्याने पाच मार्ग.

① जन्माने प्राप्ती : ⇒ २६ जाने १९५० नंतर व १ जुलै १९८७ पूर्वी ज्या व्यक्तीचा जन्म भारतात (आई वडीलांचे नागरिकत्व कोणतेही असेल)

⇒ १ जुलै १९८७ रोजी किंवा त्यानंतर - जन्म - भारतात व जन्माच्या वेळी आई वडीलांपैकी एक भारताची नागरिक

⇒ ३ डिसें २००४ किंवा त्यानंतर जन्म भारतात व जन्माच्या वेळी आई वडील दोघेही भारताचे नागरिक असतील / किंवा त्यापैकी एक भारताचा नागरिक असेल व दुसरा बेकायदेशीर स्थलांतरीत नसेल.

→ भारतातील परदेशी वकिलातील व्यक्तींची मुले व शत्रुराष्ट्रातील नागरिकांची मुले जन्माने भारतीय नागरिक होवू शकत नाही.

② वंशपरंपरेने प्राप्ती.

→ जन्म २६ जाने १९५० नंतर १० डिसें १९९२ पूर्वी भारताबाहेर जन्माच्या वेळी वडील भारताचे नागरिक असतील

⇒ १० डिसें १९९२ - जन्म भारताबाहेर जन्माच्या वेळी आई किंवा वडील भारताचे नागरिक असतील

⇒ ३ डिसें २००४ - नंतर जन्म भारताबाहेर तर ती व्यक्ती वंशपरंपरेने भारताची नागरिक होत नाही. मात्र एक वर्षाच्या आत किंवा केंद्र सरकारची परवानगी घेवून त्यापेक्षा अधिक काळावधी नंतरही त्या व्यक्तीच्या जन्माची नोंद

२१

भारतीय वकिलातीमध्ये केल्यास भारतीय नागरिक बनते. परंतु अज्ञान बालकाची जन्म नोंद करत असताना त्याकडे दुसऱ्या देशाचे पारपत्र नाही असे हमीपत्र द्यावे लागते.

⇒ एखादी अज्ञान व्यक्ती वंशपरंपरेने भारताची नागरिक बनली असेल पण ती एखाद्या देशाची नागरिक असेल आणि तिने सज्ञान झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत त्या दुसऱ्या देशाच्या नागरिकत्वाचा त्याग केला नसेल तर ती भारताची नागरिक राहत नाही.

## ③ नोंदणीद्वारे प्राप्ती - (बेकायदेशीर स्थलांतरित सोडून)

① नोंदणी करण्यापूर्वी → सात वर्षे भारतात वास्तव्य → भारतीय वंशाची व्यक्ती.

② अविभाजित भारत सोडून इतर देशात वास्तव्य → —॥—

③ भारतीय नागरिकाशी विवाह केलेली - नोंदणी अर्जापूर्वी → सात वर्षे भारतात वास्तव्य.

④ भारतीय नागरिक → व्यक्तींची अज्ञान मुले.

⑤ भारतीय नागरिक म्हणून नोंद असलेल्या आई वडिलांची सज्ञान व पात्र मुले.

⑥ भारताचा परदेशस्थित नागरिक (Overseas Citizen) म्हणून ५ वर्षे नोंदणी असलेली सज्ञान व पात्र व्यक्ती अर्ज करण्यापूर्वी लगतच एक वर्ष भारतात वास्तव्य.

⇒ भारताचा सामान्यपणे निवासी समजला जाण्यासाठी :

① नोंदणी अर्ज करण्यापूर्वीच्या संपूर्ण १२ महिन्यात भारतात वास्तव्य.

② त्या १२ महिन्यांच्या अगोदरच्या आठ वर्षांपैकी ६ वर्षे एवढा काळ वास्तव्य.

⇒ व्यक्तीचा किंवा आई वडिलांपैकी एकाचा जन्म अविभाजित भारतात किंवा १५ ऑगस्ट ४७ नंतर भारतीय क्षेत्रात झाला असेल तर तिला भारतीय मूळ असलेली व्यक्ती (Indian Origin) म्हणतात.

## ④ स्वीकृतीने प्राप्ती

खालील अटींची पूर्तता - केल्यास केंद्र सरकार वास्तव्याचा दाखला देऊ शकते.

① ज्या देशात भारतीय नागरिकास नागरिक होण्यास बंदी आहे अशा देशाचा नागरिक नसावा.

② दुसऱ्या देशाचे नागरिक → भारतीय नागरिकत्वासाठी अर्ज → पूर्वीच्या नागरिकत्वाचा त्याग करावा.

③ अर्ज करण्यापूर्वी - लगतच्या १२ महिन्यात वास्तव्य व त्यापूर्वी १४ वर्षांत ११ वर्षांपेक्षा जास्त काळ भारतात वास्तव्य किंवा भारत सरकारच्या सेवेत.

## ⑤ क्षेत्र विलीनीकरणाने प्राप्ती :

अशा वेळी कोणत्या व्यक्ती नागरिक होतील हे भारत सरकार ठरवते.

१९६२ साली पुदुच्चेरी भारताचा भाग बनला त्यावेळी १९५५ कायद्यानुसार नागरिकत्व आदेश १९६२ जारी केला.

## नागरिकत्वाचा ऱ्हास — तीन पद्धती :

① नागरिकत्वाचा त्याग - नागरिकत्व सोडण्याचे निवेदन.

ज्यावेळी व्यक्ती आपले भारतीय नागरिकत्व सोडते तेव्हा त्या व्यक्तीच्या सर्व अज्ञान मुलांचे भारतीय नागरिकत्वही संपुष्टात येते. सज्ञान झाल्यावर परत प्राप्त करू शकते.

Scanned by CamScanner

② नागरिकत्व संपुष्टात येणे :

स्वेच्छेने दुसऱ्या देशाचे नागरिकत्व घेणे त्यावेळी भारतीय नागरिकत्व आपोआप संपुष्टात येणे. (युद्ध काळ सोडून)

③ नागरिकत्व हिरावून घेतले जाणे

① फसवणूक करून मिळविले असेल
② राज्यघटनेशी द्रोह केला असेल
③ युद्ध काळात शत्रूशी संपर्क ठेवला असेल.
④ नोंदणी किंवा स्वीकृतीने नागरिकत्व मिळाल्यावर ५ वर्षांच्या कालावधीत कोणत्याही देशात २ वर्षे कैद झाली असल्यास.
⑤ सलग सात वर्षे भारताबाहेर वास्तव्य.

एकेरी नागरिकत्व

- एकच (देशाचे) नागरिकत्व. राज्याचे स्वतंत्र नागरिकत्व
अमेरिका व स्विझर्लंड - दुहेरी नागरिकत्व
भारतात सर्वांना समान राजकीय व नागरी अधिकार.

→ अपवाद - कलम १६ अंतर्गत राज्यातील किंवा संघराज्य प्रदेशातील काही नोकऱ्या किंवा नियुक्तीसाठी राज्यातील वास्तव्य हा निकष अवैध. त्यासाठी सार्वजनिक नोकऱ्या कायदा १९५७ संमत.

→ अनुसुचित जमातीच्या हितास धक्का न पोहचता कलम १९ अनुसार संचाराचे आणि वास्तव्याचे स्वातंत्र्य - अनुसुचित क्षेत्रात बाहेरच्या व्यक्तीचा प्रवेश वास्तव्य, स्थायिक होणे यावर बंधने.

⇒ जम्मू काश्मीरच्या बाबतीत वास्तव्य, नोकरीत अधिकार, स्थावर मिळकत घेणे स्थायिक होणे, शिष्यवृत्ती - हे अधिकार राज्य विधिमंडळाला.

परदेशास्थित भारतीय नागरिकत्व:

सप्टें २००० मध्ये - एल.एम. सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली प्रवासी (इतरत्र राहणाऱ्या) भारतीयांसाठी समिती:

उद्देश → ① जगभर विखुरलेल्या भारतीयांचे सर्वंकष अध्ययन
② त्यांच्याबरोबर रचनात्मक संबंध प्रस्थापित करणे.

⟶ जाने २००२ मध्ये अहवाल — शिफारस

काही विशिष्ट देशातील भारतीय मूळ असलेल्या व्यक्तींना दुहेरी नागरिकत्व देता यावे - यासाठी १९५५ च्या कायद्यात दुरुस्ती करावी.

⟹ त्यानुसार नागरिकत्व दुरुस्ती अधिनियम २००३

पाकिस्तान व बांग्लादेश सोडून १६ देशातील भारतीय मूळ असलेल्या व्यक्तींसाठी परदेशास्थित भारतीय नागरिकत्वाची तरतूद करण्यात आली.

→ त्यानंतर नागरिकत्व अधिनियम २००५ (दुरुस्ती) मान्यता असणाऱ्या पाकिस्तान व बांग्लादेश सोडून - दुहेरी नागरिकत्वाला इतर सर्व देशातील भारतीय मूळ असलेल्या व्यक्तींना परदेशस्थित भारतीय.

* परदेशस्थित नागरिकत्व म्हणजे दुहेरी नागरिकत्व नाही *

→ नागरिकत्व दुरुस्ती अधिनियम २००५

परदेशस्थित नागरिकत्वात बदल ⇒ भारतीय मूळ व्यक्तीसाठीची कार्ड योजना } विलिन
परदेशस्थित भारतीयासाठीची कार्ड योजना }

परदेशस्थित भारतीय नागरिकत्व कार्डधारक योजना - नवी योजना.

भारतीय मूळ असलेल्या व्यक्तींसाठी कार्ड योजना ⇒ १५ ऑगस्ट २००२
परदेशस्थित भारतीय नागरिकांसाठी —॥— ⇒ १ डिसे २००५

- परदेशस्थित भारतीय नागरिक कार्डधारकाची नोंदणी:

खालील मुद्दे:-

(अ) पूर्ण वय:
- जी दुसऱ्या देशाची नागरिक आहे पण घटना लागू होताना किंवा त्यानंतर भारताची नागरिक होती. किंवा
- जी दुसऱ्या देशाची नागरिक आहे पण घटना लागू होताना किंवा त्यानंतर १५ ऑ १९४७ नंतर भारताचा भाग बनलेल्या क्षेत्रातील होती.
- किंवा अशा नागरिकाचा मुलगा किंवा नातू किंवा पणतू आहे.

(ब) कलम अ मध्ये नमूद केलेल्या व्यक्तीचे अल्पवयीन मूल.

(क) माता पिता दोघेही भारताचे नागरिक किंवा पैकी एक भारताचा नागरिक असलेल्या व्यक्तीचे अल्पवयीन मूल.

परदेशस्थित भारतीय नागरिक कार्डधारकांना दिलेले हक्क:

(1) केंद्र सरकार निश्चित करेल

नसलेले हक्क: (1) लोकसेवेत समान संधीचा हक्क नसेल
(2) राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय न्यायाधीश पात्र नसेल
(3) मतदार म्हणून नोंदणीस पात्र नसेल
(5) खासदार बनण्यास अपात्र / आमदार - अपात्र.

* NRI ⇒ Non Resendential Indians → भारतीय पारपत्रधारक / भारताबाहेर राहणारा भारतीय नागरिक.

* PIO ⇒ Person of Indian Origin → पूर्वी भारतीय परंतु परदेशी पारपत्र व नागरिकत्व.

* OCI ⇒ Overseas Indians ⇒ परदेशस्थित भारतीय नागरिक कार्डधारक.

Scanned by CamScanner